SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : १५१ ● पुणे ● शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




नऱ्हेभागातील जनतेचे हक्काचे नेतृत्व,
खडकवासला विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस कार्याध्यक्ष,

जननायक भावी नगरसेवक

# भूपेंद्रभाऊ मोरे

आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा..!

•शुभेच्छुक : शिवराज्य समुह पुणे शहर,भूपेंद्रभाऊ मोरे मित्र परिवार

दैनिक **आरंभपर्व** आरंभ एका नव्या पर्वाचा






# मानसिकता समजून घ्यावी लागेल!

काश्मीरमधील पहलगाम येथील क्रूर आणि भ्याड हत्याकांडाने सगळा देश हादरून गेला आहे. ज्यांच्या कुटुंबातले लोक या हल्ल्यात मारले गेले त्यांच्या कुटुंबीयांचा आक्रोश कानात सर्वांच्या घुमतो आहे. क्रूरकर्म्यांचे ते क्रूर कृत्य लोकांच्या डोळ्यांसमोरून अजूनही जात नाही अशी स्थिती आहे.

गेला संपूर्ण आठवडा मूर्शताबाद आणि बंगालमधील मुस्लीम बहुल ठिकाणी तसेच अन्य सर्वत्र वक्फ बोर्डाच्या नवीन कायद्यासंदर्भात झालेली निदर्शने आणि त्या निमित्ताने झालेली आंदोलने, हिंदूंवर झालेले अत्याचार याने हिंदू जनमानस ढवळून निघाला होता. आणि आता ही घटना घडली आहे. समाज क्षुब्ध होत आहे. सरकारकडे कडक कारवाईच्या मागण्या होत आहेत. मोर्चे निघत आहेत. पाकिस्तान विरुद्धच्या घोषणा होत आहेत. नेहमीप्रमाणे राजकारणी गिधाडे या सगळ्या प्रसंगात ही आपली गिधाडी वृत्ती न सोडता सरकारवर आरोप करीत आहेत .

रॉबर्ट वडेरा हिंदुत्वाला दोष देत आहे. उबाठा गटाचे प्रवक्ते आणि तमाम उबाठा गँग भाजपाने धर्मावर आधारित भांडणे लावल्यामुळे ही घटना घडल्याचा आरोप करून आपला नालायकपणा सिद्ध करत आहे. फारुख अब्दुल्ला पाकिस्तानी लोकांनी बांगड्या भरलेल्या नाहीत अशी दर्पोक्ती करण्याची हिंमत करतो आहे आणि भारतातील या सगळ्या घडामोडींकडे बघून पाकिस्तानी राक्षस मनोमन हसतो आहे.

मोहम्मद बिन कासीम, गझनी मोहम्मद, मोहम्मद घोरी, तुघलक, खिलजी, बाबर, औरंगजेब, अफझल खान या आक्रमकांच्या अत्याचारांच्या कहाण्या पुन्हा जागृत होणारे हत्याकांड काल घडले. दहशतवादीवृत्तीला धर्म नसतो हे लिब्रांडू, डावे, तथाकथित सेक्युलरिस्ट यांच्या आवडत्या वाक्याला छाती ठोकून या दहशतवाद्यांनी धर्म विचारत, कलमा वाचायला लावून, सुंता झाली नाही याची खात्री करत निष्पाप लोकांना गोळ्या घातल्या आणि सिद्ध केले आमच्या दहशतवादाचा धर्म कोणता आहे ते. हिंदू समाज ही मानसिकता न समजल्यामुळे पारतंत्र्यात



गेला. काही काळ गुलाम बनला. खंडित झाला.

स्वतंत्र झाल्यावर आजही ७५ वर्षांनी आतंकी छायेतून स्वतःला बाहेर काढू शकलेला नाही. राजकारण्यांनी ही मानसिकता जाणूनबुजून मतांच्यासाठी दुर्लक्षित केली. प्रशासकीय व्यवस्थेतील इंग्रज छाप बाबूंनी या मानसिकतेला जिवंत ठेवले. मुल्ला, मौलवी यांनी स्वतंत्र भारतात ही मानसिकता आणखी प्रज्वलित केली. परिणाम काश्मीर ते सर्वत्र भारतमाता रक्तबंबाळ होत चालली आहे. ही मानसिकता समजून घेण्यासाठी काफीर, गझवा ए हिंद, दार उल अरब, दार उल इस्लाम, जिहाद या संकल्पना ज्या मदरशांमधून शिकवल्या जातात आणि त्यातून रॅडिकल इस्लामी आतंकवादी जन्म घेतात या संकल्पना हिंदू समाजाला समजणे गरजेचे आहे. राजकारण्यांनी कुठल्याही पक्षाचे असेना आपल्या भावी पिढ्यांच्यासाठी का होईना याचा जमिनीवरील परिणाम मतांच्या लालसेतून बाहेर येत समजून घेतला पाहिजे . भाषिक अस्मिता, प्रांतिक अहंकार, जातीय दुराभिमान ज्यामुळे हा हिंदू समाज एकसंध होत नाही त्या वृथा गोष्टींचे अंकुर, काटे छाटून टाकले पाहिजेत कारण यापेक्षा वर उल्लेख केलेल्या संकल्पना उद्या तुमच्या घराचे दरवाजे तोडून कधी आत घुसतील ते कळणार पण नाही. पश्चाताप त्यावेळी करण्यापेक्षा हिंदूंनो वेळीच सावरा आणि संघटित व्हा.

या रॅडिकल, एकेश्वरवादी विचारांनी संपूर्ण जगाची शांतता बिघडवली आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली, ब्रिटन, सगळे देश आज होरपळून निघत आहेत. स्वस्त मजूर मिळतात या मोहातून आणि उदार मानसिकता यातून केलेल्या चुकांमुळे त्यांना आज पश्चात्ताप होत आहे. सर्वत्र लोकसंख्येचे असंतुलन घुसखोरी आणि अमर्यादित प्रजनन या दोन मार्गांतून साधले जात आहे. संपूर्ण जग ज्वालामुखीच्या तोंडावर उभे आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या मनुष्य या सर्वोच्च सुंदर निर्मितीला नष्ट करत आणि त्यातून निर्माण झालेल्या उज्ज्वल मानवी मूल्यांना पायदळी तुडवत खैबर खिंडीतून आलेल्या या वावटळीला कोणे एके काळी पृथ्वीराज चौहान, राणा सांग, राजा दाहीर, राणा प्रताप, गुरू गोविंद सिंग, राजा रणजीत सिंग, लाचित बड फुकान आणि अर्थात आमच्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रोखून धरल्यामुळे जगातील मानवता अजूनही टिकून आहे.

छत्रपती शिवरायांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून प्रतापराव गुजर यांना त्यांनी दूषणे दिली. त्यांनी ही मानसिकता ओळखली होती म्हणून अफजलखान याचा वध झाला, शाहिस्तेखानाची बोटे गेली. हिंदू साम्राज्याची पुन्हा निर्मिती झाली. आमच्या आजूबाजूला असणाऱ्या आणि काळाच्या ओघात मुस्लीम झालेल्या मंडळीनी मुल्ला मौलवी यांचा पगडा झुगारून दिला नाही. हिंदूंच्या भावभावना समजून घेतल्या नाहीत, तर येणाऱ्या काळात संघर्ष अटळ आहे. ही लढाई एकेश्वर वाद आणि एकम् सत् विप्रा: बहुदा वदंती यातील आहे. जर हिंदू समाजाने ही मानसिकता समजून घेतली, तर या लढाईत हिंदू टिकाव धरू शकेल अन्यथा काय होईल हे सांगता येत नाही. कुठल्याही सरकारवर, पक्षावर, संघटनेवर आपले भविष्य सोपवून तात्कालिक मोर्चे काढून, स्मशान वैराग्य आणून हा प्रश्न सुटणार नाही. पाकिस्तान हा एक देश किंवा भूभाग नाही ती वृत्ती आहे. अखंड भारतात ती वृत्ती सर सय्यद अहमदखान याने जिवंत केली. मोहम्मद जीनाने त्यात अजून हवा भरली. परिणाम हिंदूंचा संहार. खिलाफत चळवळ परिणाम हिंदूंचा संहार. बांगला देशात सत्तांतर परिणाम हिंदूंचा संहार.

मंदिरे लक्ष्य करणे, स्त्रियांना बाटवणे आणि हिंदूंना अपमानित करण्याची एकही संधी न सोडणे यातून जे घडत आले त्यातील एक घटना पहलगाममधली आहे. पुढील रमझान येईल तेव्हा काश्मीर आपल्या ताब्यात असेल, असे उद्गार काढणारा अतिरेकी संघटनेचा सरदार आणि पाकिस्तान नेमके का निर्माण झाले हे छातीठोकपणे सांगणारा पाकिस्तानचा आर्मी चीफ सगळ्यांचे लक्ष एकच आहे. हिंदू म्हणणारे सर्व संपवणे. मग त्यात बौद्ध, जैन, शीख, आस्तिक, नास्तिक सर्व आले. कुणीही सुटणार नाही. हे लिहिण्यामागे प्रस्तुत लेखकाचे समाजाला भयभीत करण्याचा उद्देश बिलकुल नाही. भारतातील मुस्लिमांनी इंडोनेशियाचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून कट्टरता वाद नाकारला पाहिजे. यातच त्यांचे भले आहेच पण जागतिक शांततेसाठी ते आवश्यक आहे. हिंदू तत्त्व हे मूर्ती पूजा मानणारच.

# सूर्यदत्त ग्रुपतर्फे दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

## *विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतली शांतता व सामाजिक सौहार्द टिकवण्याची शपथ*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पहलगाम दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबांप्रती सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संवेदना व्यक्त करते. या कुटुंबियांच्या पाठीशी सूर्यदत्त परिवार ठामपणे उभा आहे. आपल्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतून करुणा, न्याय आणि घटनात्मक नीतिमत्ता या मूल्यांची जोपासना सातत्याने सूर्यदत्त करत आहे," असे मत सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप बांधवाना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया आणि उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यदत्त ग्रुपच्या वतीने कँडल मार्चचे आयोजन केले होते. 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, महासंचालक व मुख्य विकास अधिकारी एस. रामचंद्रन, प्राचार्य अरिफ शेख, सायली पांडे, वंदना पांडे, केतकी बापट यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, १००० विद्यार्थ्यांनी या मार्चमध्ये सहभाग घेतला. दुःख आणि




**● बावधन : पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी, तसेच शांतता, करुणा व राष्ट्रीय एकतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे कँडल मार्च काढण्यात आला. यावेळी स्नेहल नवलखा, एस. रामचंद्रन, भास्कर वर्दी, सविता गांधी, मानकुरानी, गोयल, डॉ. श्रीकांत जगताप, डॉ. अरिफ शेख, डॉ. सायली पांडे, ऋता जोशी यांच्यासह सूर्यदत्त'च्या विविध शाखांचे विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, सूर्यदत्त ग्लोबल आर्मीचे कर्मचारी सहभागी झाले होते. ●**

करुणेच्या भावनेने सर्वानी एकत्र येत एकतेचे प्रतीक दाखवून दिले.

सूर्यदत्त विधी महाविद्यालय (एसएलसी), सूर्यदत्त कॉलेज ऑफ मॅनेजमेंट इन्फर्मेशन अँड टेक्नॉलॉजी (एससीएमआयआरटी), सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी), सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेज (एसजेसी), सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझम (एससीएचएमटीटी), सूर्यदत्त कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च (एससीपीएचआर), सूर्यदत्त इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायबर सिक्युरिटी (एसआयआयसीएस), सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस - कॉलेज ऑफ फिजिओथेरपी (एसआयएचएस-सीओपी), सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नॉलॉजी (एसआयबीएमटी) आणि सूर्यदत्त कॉलेज ऑफ नर्सिंग पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजी (एससीएनपीएसटी) या संस्थांनी या मॅर्चमध्ये सहभाग घेतला.

'सूर्यदत्त'च्या बावधन कॅम्पसपासून कँडल मार्चला सुरुवात झाली. शांततेच्या वातावरणात निघालेल्या या मार्चमधून शांतता, मानवता, राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यात आला. चांदणी चौक, पाषाण रोड

या जवळपास एक ते दीड किलोमीटर परिसरात हा मार्च निघाला. मार्चमध्ये सहभागींनी सौहार्द वाढवणारे आणि हिंसेचा निषेध करणारे संदेश असलेले फलक हातात धरले होते.

स्नेहल नवलखा म्हणाल्या, "हा कँडल मार्च केवळ पीडितांना आदरांजली नाही, तर शांतता, न्याय आणि ऐक्य या मूल्यांना जपण्याबाबत आपल्या बांधिलकीची पुनःप्रतीतीही आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि सहवेदना निर्माण करणे आणि राष्ट्रीय संकटाच्या काळात एकतेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या मार्चचा हेतू होता. मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटांचे मौन पाळण्यात आले आणि उपस्थित सर्वांनी शांतता व सामाजिक सौहार्द यासाठी शपथ घेतली."

डॉ. आरिफ शेख यांनी विद्यार्थ्यांना आपल्या हृदयात द्वेष न बाळगता समाजात शांतता, एकता आणि करुणेचे दूत होण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन केले. डॉ. सायली पांडे यांनी या आव्हानात्मक काळात सौहार्द आणि सामाजिक एकात्मतेचे मशालधारक बनण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

वंदना पांडे म्हणाल्या, "लोकांबद्दल मनात द्वेषभावना बाळगू नका. त्यांच्या मनात मानवतेचे, करुणेचे बीज पेरा. शांततेवर प्रेम करा. अन्यायाचा, अत्याचाराचा, लोभाचा द्वेष करा. स्वतः या सर्व गोष्टींपासून दूर राहून मानवता, करुणा आत्मसात करा."

केतकी बापट यांनी विद्यार्थ्यांना द्वेष सोडून शांतता, एकता आणि परस्पर सन्मान या मूल्यांचे सर्व क्षेत्रांत पालन करण्याची शपथ घेण्याचे आवाहन केले. कायद्याचे विद्यार्थी आणि जबाबदार नागरिक म्हणून आपल्याला अशा अमानवी कृत्यांविरुद्ध ठाम आवाज उठवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनीही यावेळी मनोगत व्यक्त करीत मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. मोनिका सेहरावात यांनी पुढाकाराने सूर्यदत्त ग्लोबल आर्मीने या कँडल मार्चचे शांततेत या कँडल मार्चचे आयोजन केले.

# आश्वासन समिती प्रमुखपदी आ. प्रविण दरेकर यांची निवड

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र विधानपरिषद २०२४-२५ या वर्षासाठी विधिमंडळाच्या विविध समित्या विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी विधान परिषद सदस्यांची नामनियुक्ती केली आहे. तशा प्रकारचे परिपत्रक विधिमंडळाने आज प्रसिद्ध केले आहे. विधिमंडळ कामकाजात महत्वाच्या अशा आश्वासन समितीच्या समिती प्रमुख पदी भाजपा विधानपरिषद गटनेते आ. प्रविण दरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या आश्वासन समितीत



आ. प्रविण दरेकर यांच्यासोबत सदस्य म्हणून विधानपरिषद आ. चित्रा वाघ, आ. धर्मगुरू राठोड, आ. कृपाल तुमाने, आ. विक्रम काळे, आ. अभिजीत वंजारी, आ. मिलिंद नार्वेकर, आ. अरुण लाड यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये मंत्र्यांकडून सन्माननीय सदस्यांना आश्वासने दिली जात. या आश्वासनांची पूर्तता शासनाकडून केले गेले किंवा नाही, याची तपासणी ही समिती करत असते.

# फोनपेतर्फे अक्षय्य तृतीयेनिमित्त हमखास कॅशबॅक ऑफरची घोषणा

**--- (दै. आरंभ पर्व)**

पुणे (दैनिक संध्या) : फोनपे ने आज अक्षय्य तृतीयाच्या निमित्ताने २४ कॅरेट डिजिटल सोनेखरदीवर आकर्षक कॅशबॅक ऑफर्सची घोषणा केली. युझर्सनी फोनपे प्लॅटफॉर्मवर किमान रु. २००० किमतीचे डिजिटल सोने खरेदी केल्यावर फ्लॅट १ टक्के (कमाल ₹2000 पर्यंत) कॅशबॅक मिळू शकते. ही ऑफर फक्त ३० एप्रिल रोजी एकदाच होणाऱ्या व्यवहारासाठी लागू आहे (प्रत्येक युझरसाठी एकदाच वैध). युझर्स यूपीआय, यूपीआय लाइट, क्रेडिट आणि डेबिट कार्ड, वॉलेट आणि गिफ्ट कार्ड्ससारखे विविध पेमेंट मोड्स वापरून ही खरेदी करू शकतात. सणाच्या उत्साहात भर घालत कॅरटलेन स्टोअर्स व वेबसाइटवर डिजिटल सोन्याच्या रिडम्प्शनसाठी फोनपेतर्फे खास ऑफर देण्यात आल्या आहेत. सोन्याच्या नाण्यावर अतिरिक्त २% डिस्काउंट, अनस्टडेड (खडे न जडवलेले) दागिन्यांवर अतिरिक्त ३% डिस्काउंट तसेच स्टडेड (खडे जडवलेले) दागिन्यांवर अतिरिक्त ५ टक्के डिस्काउंट एमएमटीसी-पीएएमपी, सेफगोल्ड आणि कॅरटलेनसारख्या आघाडीच्या व विश्वासार्ह डिजिटल गोल्ड विक्रेत्यांकडून फोनपे प्लॅटफॉर्मवरून युझर्स ९९.९९% शुद्धता-प्रमाणित २४ कॅरटचे डिजिटल सोने विकत घेऊ शकतात. फोनपे प्लॅटफॉर्मवरून भारतभरातील १. २कोटी ग्राहकांनी अधिक शुद्धता असलेले २४ कॅरटचे सोने विकत घेतले आहे. एकवेळ खरेदीव्यतिरिक्त फोनपेतर्फे युझर्सना दैनिक वा मासिक एसआयपीच्या माध्यमातून सोन्यामध्ये डिजिटल स्वरुपात गुंतवणूक करण्यास सक्षम करते. यामुळे ग्राहकांना दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध गुंतवणूक करता येते. ग्राहकांच्या त्यांच्या इच्छेनुसार रक्कम गुंतवू शकतात, तसेच त्यांनी खरेदी केलेले सोने कधीही विकण्याची सुविधाही उपलब्ध आहे. विक्री केल्यानंतरची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होते. ही ऑफर ३० एप्रिल २०२५ रोजी सुरु होणार असून रात्री १२ ते रात्री १२ या कालावधीत एकदाच होणाऱ्या व्यवहारासाठी वैध आहे. ही ऑफर एसआयपी व्यवहारांवर लागू होणार नाही. प्रत्येक युझरसाठी ही ऑफर फक्त एकदाच वैध आहे.

# महाराष्ट्र सायबर आणि जेनएस लाईफ यांची हातमिळवणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जेन एस लाईफने ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य बनवण्याच्या वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांविरुद्ध जागरूकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सायबरशी भागीदारी केली आहे. जेन एस लाईफ हे तुमच्या वयाच्या साठीच्या पुढच्या आयुष्यासाठी उपयुक्त असे एक ॲप आहे. वरिष्ठ नागरिकांना जीवनाचा परिपूर्ण अनुभव घेता यावा यासाठी त्यांना सक्षम बनवणारा हा एक टेक्नॉलॉजी-सक्षम आणि आकर्षक प्लॅटफॉर्म आहे.

**४९०० रु. च्या वार्षिक प्रीमियम सह हा गोल्ड प्लान 5 लाख रु. पर्यंत सायबर इन्शुरन्स प्रदान करतो. याशिवाय त्यात हॉस्पि-कॅश, व्यक्तिगत अपघात विमा, खास किफायतशीर सेवा यांचा लाभ देखील आहे.**

**ज्येष्ठांना सायबर धोक्यांचा वेळोवेळी सामना करावा लागतो, त्यावर उपाययोजना करताना जेन एस लाईफ ने खास आपल्या गोल्ड प्लानच्या सदस्यांसाठी सायबर इन्शुरन्स लॉन्च केला आहे, जो फसवणुकीमुळे होणारे नुकसान कव्हर करतो तसेच सोपी सुरक्षा मार्गदर्शिका, संवादात्मक जागरूकता सत्रे आणि २४ तास सेवा प्रदान करतो.**

महाराष्ट्र सायबरने नमूद केले आहे की सायबर गुन्ह्यांच्या दररोज ५००० तक्रारी नोंदल्या जातात. याचा अर्थ दर मिनिटाला ४ सायबर गुन्हे घडत आहेत. सध्या सगळ्यात जास्त आढळणारा घोटाळा म्हणजे 'डिजिटल अरेस्ट', ज्यामध्ये गुन्हेगार स्वतः कायदा अंमलबजावणी अधिकारी असल्याचे सांगून आणि कायदेशीर कार्यवाहीच्या धमक्या देऊन वृद्धांकडून पैसे उकळतात.

ज्येष्ठ मंडळींना लक्ष्य करून होणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे आणि एकीकडे नवीन टेक्नॉलॉजी विकसित होत आहे. आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, सुरक्षा आणि डिजिटल धमक्यांविरुद्ध जागरूकता निर्माण करणे हे फार महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्र सायबरचे पोलीस महाउपनिरिक्षक श्री. संजय शिंत्रे यांनी जेन एस लाईफ सोबत बोलताना ज्येष्ठ नागरिक कसे फसवणुकीला सहज बळी पडू शकतात यावर प्रकाश टाकताना म्हटले, "भारतात १५ कोटींपेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांचे डिजिटल ज्ञान मर्यादित असते आणि आर्थिक संपत्तीपर्यंत पोहोच असल्यामुळे स्वाभाविकपणे त्यांना सायबर गुन्ह्यांसाठी प्रामुख्याने लक्ष्य बनवले जाते. डिजिटल अरेस्टच्या बाबतीत नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवा की, कोणतेही सरकारी खाते किंवा पोलीस, विमानतळ, कस्टम्स, इन्कम टॅक्स, सीबीआय, क्राइम ब्रांच, सीआयडी, ईडी सारख्या कायदा अंमलबजावणी एजन्सी कधीही व्हिडिओ कॉल मार्फत चौकशी करत नाहीत."

महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या सक्रिय उपाययोजनांवर भर देत श्री. शिंत्रे म्हणाले, "या वाढत चाललेल्या धोक्याचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने खास सायबर गुन्हे हाताळणारी केंद्रे स्थापित केली आहेत. ही भारतातील एक अशी व्यवस्था आहे, जेथे गुन्ह्याला बळी पडणारा माणूस आमच्या हेल्पलाइन नंबरमार्फत २४ तासात केव्हाही गुन्हा नोंदवू शकतो. या वाढत्या घोटाळ्यांविषयीचे मार्गदर्शन सतत प्रकाशित करून आम्ही नागरिकांना सतर्क राहण्याची विनंती करत आहोत. आम्ही एक समर्पित प्लॅटफॉर्म विकसित केला आहे, जेथे बळी पडलेली व्यक्ती तक्रार नोंदवून तत्काळ तपास सुरू करवू शकते."

ते पुढे म्हणाले भारत सरकारने 26 लाखांपेक्षा जास्त बनावट मोबाइल नंबर ब्लॉक केले आहेत, जे सायबर गुन्ह्याविरुद्धच्या लढ्यातील एक लक्षणीय पाऊल आहे. ज्येष्ठ नागरिकांना अधिकृत मार्गदर्शिकांची माहिती असली पाहिजे, त्यांनी आपले मोबाइल सुरक्षित ठेवून डिजिटल स्वच्छता राखली पाहजे आणि अज्ञात कॉल आणि मेसेज नेहमी तपासून घेतले पाहिजेत.

काहीही संशयास्पद वाटल्यास कुटुंबातील एखाद्या विश्वासू माणसाशी बोलावे किंवा आमच्या हेल्पलाइनशी संपर्क साधावा.

# थोडक्यात

## येत्या शुक्रवारी वसंतोत्सव महोत्सवाचे आयोजन




**पुणे (आरंभ पर्व) : फोकलोर अ‍ॅन्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशन पुणे यांच्यावतीने एक दिवसीय वसंतोत्सवाचे आयोजन येत्या २५ एप्रिल रोजी केले असून सकाळी १०.०० वा. पहिला मजला, श्रमिक पत्रकार भवन नवी पेठ येथे प्रा.व प्रमुख ललित कला केंद्र गुरुकुल सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्रमुख डॉ. प्रवीण भोळे यांच्या हस्ते उद्घाटन पार पडणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय संचार ब्युरो माहिती व प्रसारण प्रबंधक डॉ. जितेंद्र पानपाटील, तर प्रमुख अतिथी पोलिस अधीक्षक तेजस्वी सातपुते असणार आहेत. वसंतोत्सवाची सुरुवात चैत्रांगणाचे पूजन करून होणार आहे. सुरुवातीला मान्यवरांचा सत्कार केला जाणार आहे. त्यानंतर सत्कारमूर्ती ममता सपकाळ, भाग्यश्री देसाई, नीलिमा पटवर्धन, संध्या पुजारी या सर्वांचा त्यांच्या क्षेत्रातील योगदानाबद्दल फाऊंडेशनच्या वतीने पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यानंतर गौरी वनारसे व निकिता बहिरट यांच्या संबळ वादन आणि देवीचा जागरण होणार आहे. समाजसेविका ममताताई सपकाळ यांची विशेष मुलाखत डॉ.सुनीता धर्मराव घेणार आहेत. दुपारच्या सत्रात लावणी सौंदर्यवती रेश्मा परितेकर, लावणी डॉ .सुखदा खांडगे यांचे कथ्थक,सौ. आश्विनी छत्रपती व संच पारंपरिक खेळ गाणी सादर करणार आहेत.अशी माहिती फोकलोर ऍण्ड कल्चरल हेरिटेज फाउंडेशनच्या संचालक डॉ. सुनीता धर्मराव व मृणालिनी खंदारे यांनी पत्रकाद्वारे दिली. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य राहील.**

## समवेदना संस्थेतर्फे शनिवारी अच्युत गोडबोले यांचे 'एआय'वर व्याख्यान



**पुणे (आरंभ पर्व) : समवेदना संस्थेच्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रसिद्ध लेखक व वक्ते अच्युत गोडबोले यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'एआयची जादू आणि उद्याचे जग' या विषयावर अच्युत गोडबोले खास त्यांच्या शैलीत गप्पा, गोष्टी आणि 'एआय'चा इतिहास, वर्तमान, आरोग्य क्षेत्रातला उपयोग आणि भविष्यातील परिणाम यांची सुरेख सफर घडवणार आहेत. गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत, वस्तीपातळीवरील महिलांसाठी कर्करोग पूर्वनिदान तपासणी, शालेय आरोग्य उपक्रम राबवत असलेल्याला समवेदना संस्थेतर्फे वर्धापनदिनाच्या निमित्ताने सर्व देणगीदारांप्रती कृतज्ञता म्हणून दरवर्षी स्नेहमेळावा आयोजित केला जातो. यंदा हा मेळावा येत्या शनिवारी (ता. २६) सायंकाळी ५ ते ७ या वेळेत कोथरूडमधील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बालशिक्षण मंदिर सभागृहात होणार आहे. यावेळी संस्थेच्या २२ व्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन केले जाईल.**


## ओबेन इलेक्ट्रिकची सर्वात स्वस्त बॅटरी संरक्षण योजना



**पुणे (आरंभ पर्व) : भारताचा अग्रगण्य स्वदेशी संशोधन आणि विकास चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल निर्माता ओबेन इलेक्ट्रिकने प्रोटेक्ट ८/८० योजना सुरू करून ग्राहक विश्वास आणि उत्पादन हमीमध्ये एक नवीन मापदंड स्थापित केला आहे. १ मे पासून ग्राहक केवळ रु. ९,९९९ च्या किफायती दरात ८ वर्षे पर्यंत चालणारी किंवा ८०,००० किमी पर्यंतचे कव्हरेज देणारी ही सर्वसमावेशक बॅटरी वॉरंटी मिळवू शकतात. कम्युटर इलेक्ट्रिक मोटरसायकल विभागात आपल्या प्रकारची ही पहिलीच योजना ओबेनची कामगिरी, विश्वासार्हता आणि ग्राहक-केंद्रित नवोपक्रमाप्रती असलेली दृढ बांधिलकी दर्शवते. ओबेन प्रोटेक्ट प्लॅटफॉर्म अंतर्गत देण्यात येणारी ही वॉरंटी बॅटरीच्या कार्यक्षमतेवर संपूर्ण कव्हरेज पुरवते. यामध्ये दुरुस्ती, बदली आणि बॅटरीशी संबंधित सर्व समस्यांचा समावेश आहे, ज्यामुळे ग्राहक अनेक वर्षे निश्चिंतपणे प्रवास करू शकतील. या वॉरंटीच्या काळात रोर्र ईझेडचा कमाल वेग आणि त्वरण वाढवण्याची क्षमता कायम राहील याची खात्री ग्राहकांना दिली जाते. हे वैशिष्ट्य प्रत्यक्ष वापराच्या परिस्थितीत इलेक्ट्रिक वाहन मालकांच्या मोठ्या चिंतेचे थेट निराकरण करते. सध्याचे आणि भावी मालकांसाठी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे ही वॉरंटी पूर्णपणे हस्तांतरणीय आहे, ज्यामुळे रोर्र ईझेडच्या पुनर्विक्री मूल्यामध्ये वाढ होते आणि एक विश्वासार्ह व भविष्यवेधी कम्युटर मोटरसायकल म्हणून तिची स्थिती अधिक मजबूत होते.**

## थोडक्यात

### "सजना" चित्रपटाचा सुरेख टायटल साँग प्रेक्षकांच्या भेटीला !!



पुणे (आरंभ पर्व) : भारतीय संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध करणारा "सजना" चित्रपटाचा टायटल साँग प्रदर्शित करण्यात आला आहे. प्रेमातील हळव्या भावनांना स्पर्श करत, या गीतामध्ये प्रेमातील गोडवा, आठवणी, आणि नात्यांमधील निखळपणा अगदी हृदयस्पर्शी पद्धतीने मांडण्यात आला आहे. गाण्याचं चित्रिकरण देखील अत्यंत नयनरम्य आहे. सुप्रसिद्ध गायक सोनू निगम आणि राजेश्वरी पवार यांच्या भावस्पर्शी आवाजात सजलेले हे गाणं प्रेमाची नाजूक आणि गहिरं भावना व्यक्त करते. या गाण्याला संगीत दिलं आहे ओंकारस्वरूप यांनी, तर गाण्याचे बोल लिहिले आहेत सुहास मुंडे यांनी. "सजना" हे गाणं केवळ एक संगीतकृती नसून, प्रेमाच्या भावना, आठवणी आणि नात्यांची गुंफण उलगडणारं एक सुंदर चित्रण आहे. गाण्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. 'सजना' ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित एक प्रेमकथा आहे. या चित्रपटाची निर्मिती सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीत प्रेम, भावना आणि संगीत यांचं अनोखं मिश्रण घेऊन येणारा "सजना" हा नवा चित्रपट २३ मे २०२५ ला आपल्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

### यूट्यूबवर 'ॲप्लाटून' नावाचा एक नवीन ॲनिमेशन चॅनेल सुरू केला



पुणे (आरंभ पर्व) : ॲप्लॉज एंटरटेनमेंटने अलीकडेच एक नवीन आणि रोमांचक घोषणा केली आहे. ॲप्लॉज आता मुलांसाठी घेऊन येत आहे 'ॲप्लाटून' – एक नवीन ॲनिमेशन यूट्यूब चॅनेल जो केवळ आणि केवळ लहान मुलांसाठी समर्पित आहे. आणि ॲप्लॉजच्या या नव्या प्रवासाची सुरुवात होतेय एका जादुई ॲनिमेटेड सिरीज 'किया आणि कायान' सोबत, जी आधारित आहे अमर चित्र कथाच्या लोकप्रिय जूनियर लायब्ररीवर. अलीकडेच या मालिकेचा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला, ज्यामध्ये या शोच्या जादुई विश्वाची पहिली झलक दाखवण्यात आली. ही सिरीज २५ एप्रिल रोजी ॲप्लॉज एंटरटेनमेंटच्या यूट्यूब चॅनेलवर प्रीमियर होणार आहे. ४ ते ८ वर्षे वयोगटातील मुलांना लक्षात घेऊन बनवलेली, 'किया आणि कायान' ही दोन भाऊ–बहिणींची एक मजेदार आणि साहसिक कथा आहे. अपघाताने त्यांना एक व्हीआर हेडसेट सापडतो आणि ते पोहोचतात एका जादुई जागी – 'स्टोरीलँड' मध्ये. इथे त्यांना जुन्या कथा जगाची ओळख होते, जिथे त्यांना प्राचीन ज्ञान, पौराणिक प्राणी आणि रोमांचकारी शोधांचा अनुभव येतो.

### "माझी प्रारतना" मराठी चित्रपटातील पहिलं मराठी गाणं प्रदर्शित!!



पुणे (आरंभ पर्व) : प्रेमाच्या रंगांनी सजलेलं एक नवीन रोमँटिक गाणं आता प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. पद्माराज राजगोपाल नायर लिखित आणि दिग्दर्शित "माझी प्रारतना" ह्या चित्रपटाचं पहिलं गाणं प्रदर्शित झालय. या गाण्यात स्वतः पद्माराज राजगोपाल नायर आणि अनुषा अडेपचा रोमँटिक अंदाज दिसत आहे. दोघं कलाकारांना आपण शेतात रोमांस करत एकमेकांच्या मिठीत हरवलेले पाहू शकतो. यांच्यात हळुवार खुलत जाणाऱ्या प्रेमभावना या गाण्यातून व्यक्त होत आहे. दोघंही या गाण्याच्या माध्यमातून प्रेमाचे धागेदोरे घट्ट बांधताना दिसत आहेत. एकमेकांबद्दलची ओढ या गाण्यातून दिसत आहे. गायकांनी गाण्यात अतिशय उत्तम प्रकारे सादरीकरण केले आहे. हे एक अप्रतिम लव्ह सॉंग आहे जे संगीत प्रेमींन नक्कीच आवडेल. विश्वजित सी टी ह्यांनी या गाण्याला संगीत दिलय, तर सुप्रसिद्ध गायिका के. एस. चित्रा ह्यांनी आपला आवाज दिलाय तर गाण्याचे बोल हे पद्माराज राजगोपाल नायर ह्यांनी लिहिले आहेत.

## जनतेसाठी जीवाची बाजी लावणारा नेता

# जननायक भूपेंद्र भाऊ मोरे

### वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष



**शब्दांकन : लक्ष्मण साबळे**
**निवासी संपादक, पुणे**

(दै. आरंभ पर्व)

**स्वतच्या मनगटात ताकद असली की जिद्दीच्या जोरावर यशाची पायरी चढता येते. असेच आश्वासक पाऊल टाकणारे जनतेचे जनसेवक म्हणजे भूपेंद्र मुरलीधर मोरे .**

25/04/1981साली एका सामान्य कुटुंबात त्यांचा जन्म झाला .खडतर परिस्थितीत डिप्लोमा इन प्रिंटिंग केला. त्यानंतर धायरी इथे 9 वर्ष प्रेस ऑपरेटर म्हणून काम केले.2004 साली त्यांच्या वडिलांचे निधन झाले संपूर्ण परिवाराची जबाबदारी अंगावर आली. व त्यांनी भाऊ व बहीण यांना इंजिनिअर बनवले.पुढे 2005 तें 2010 रिएल एस्टेट एजन्सी व पुढे बांधकाम क्षेत्रात व्यवसाय सुरू केला.

ह्या दरम्यान जनतेचे प्रश्न लोकांच्या अडचणी व सामाजिक गरजा लक्षात घेत त्यांनी 2015 साली सामजिक कार्याला सुरुवात केली.

नऱ्हे भागातील लोकांना हक्काचा भाऊ मिळाला.खानापूर ता. हवेली येथे शालेय मुलाना साहित्य वाटप केले.

पुढे विदर्भात जाऊन शेतकऱ्याच्या कुटुंबाला मदत केली.. लोकांच्या दुःखात भूपेंद्र भाऊ आधार म्हणुन उतरले. महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी स्वप्नपूर्ती महिला फौंडेशन ची स्थापना केली .48 प्रकारचे विविध कोर्स महिलांना अल्प दरात सुरू केले.

पुढे जाऊन महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ. खेळ पैठणी चा जेष्ठ व अपंगांचा सन्मान केला. नऱ्हे गावात सर्वात मोठी शिवजयंती उत्सवाला त्यांनी सुरुवात केली.2019 मध्ये महिला दिन मिसेस मुख्यमंत्री फेम पल्लवी घोंगडे यांच्या उपस्थित पार पडला. खो खो स्पर्धा आयोजित केल्या. पोलिसांच्या क्रीडा स्पर्धेसाठी सिंहगड पोलिस टीम ला प्रोस्ताहानपर सहकार्य केले.

.ही सर्व कामे करत असताना गोकुळ नगर येथे स्वता सीसीटीव्ही यंत्रणा बसवली. विविध रस्ते स्ट्रेट लाईन बसविले.

जनतेसाठी विविध आंदोलने मोर्चे करत आधार दिला..अनेकांची वैयक्तिक कामे ही केली.राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या नेत्या खा. सुप्रियाताई सुळे यांचे विश्वासू म्हणुन भूपेंद्र भाऊ मोरे यांनी ओळख निर्माण केली. सर्वांची कामे करताना राजकारणा पेक्षा सामजिक कार्या कडे त्यांची ओढ कायम असते. जनतेच्या आग्रहाखातर एक ग्रामपंचायत निवडणूक त्यांनी लढवली मात्र त्यात थोडक्या मतांनी पराभव झाला. मात्र न डगमगता त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. वाढदिवसाच्या नीम्मीताने त्यांनी त्यांचा संकल्प बोलून दाखवला. त्यात लहान मुलांसाठी क्रीडागंन रस्ते रुंदीकरण व पाणीपुरवठा या बाबीसाठी कार्य करणार असे सांगितले. शिवाय नवले ब्रिज येथे चालू असणारा वेश्याव्यवसाय बंद झाला पाहीजे अशी आग्रही भूमिका मांडली. भविष्यात बेरोजगार युवकांसाठी रोजगार मेळावा घेऊ असे सांगितले.

लोकांत मिसळून त्यांचे प्रश्न सोडवण्याची आवड त्यांची दिसून आली.. वाढदिवसाचा मोठा खर्च टाळून त्यांनी कोरोना च्या भीषण काळात लोकांना अन्नधान्य व भाजीपाला वाटप सुरू केले आहे. शिवाय माफक दरात रुग्णवाहिके ची सोय भूपेंद्र भाऊ यांनी केली आहे.. 25/04/2021 रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन त्यांनी केले आहे..

खरंच कोरोनाच्या वातावरणात लोकप्रतिनिधी आपले कुटुंबाची जबाबदारी बघत असताना कोणते ही पद नसताना लोकांना भाऊ आधार दिला आहे.अनेक महिला नागरिक त्यांचे कौतुक करून आशीर्वाद देत आहेत..

त्यांची काम करण्याची जिद्द पाहून उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मध्ये ते सध्या सक्रिय आहेत. नऱ्हे भागातील प्रत्येक प्रश्नासाठी धावून जाणारा नेता ही त्यांची ओळख अनेकांना भावून जाते. कित्येक वर्षे या भागातील नागरिकांना रस्त्यावर वाहणारे ड्रेनेज ने भयंकर हैराण केले होते. त्यासाठी त्यांनी 2 कोटी निधी मंजूर आणून काम चालू झाले. सध्या काम प्रगतीपथावर सुरू आहे.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी घेतलेली भूमिका भयंकर गाजली होती. ह्या भागातील पाणी प्रश्न सुटावा हीच त्यांची तळमळ होती. सध्या अजूनही त्यांची तळमळ सुरूच आहे.

गावाच्या समस्येसाठी आमरण उपोषण करणारा एकमेव नेता ही त्यांची खरी ओळख आहे.

स्वतःचं जीवाची बाजी लावून जनतेसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या ह्या नेत्यास जनता खूप प्रेम करते.


भूपेंद्रभाऊ मोरे यांनी केलेले विविध कार्य नक्कीच डोळ्यात प्रकाश पाडून "जननायक भूपेंद्रभाऊ मोरे" आगामी काळात नगरसेवक भूपेंद्रभाऊ मोरे व्हायला वेळ नक्कीच लागणार नाही..

**मा. श्री. भूपेंद्र भाऊ मोरे यांना वाढदिवसाच्या मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा...**

### नऱ्हे भागाचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास

**वाढदिवसाच्या निमित्त आरंभपर्वशी प्रतिक्रिया दिली; नऱ्हेभागाच्या विकास व्हायला हवा.नऱ्हे परिसरातील नागरिकांसाठी शुद्ध व फिल्टर पाणी हे मिळवण्यासाठी लढा उभा करणार आहे. ह्या भागातील नागरिकांचे असलेले प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मी नक्की प्रयत्नशील राहणार आहे. त्यासाठी वाटेल ते परिश्रम झेलण्याची मी तयारी केली आहे. नऱ्हे परिसरात शहरातील सोयी सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात. आनंदी व सुंदर टँकरमुक्त नऱ्हे ही माझी संकल्पना आहे.**

**- भूपेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**



### वडगाव बुद्रुकचा लेक यूपीएससी परीक्षेत राज्यात दुसरा

**वडगाव बु. (दै. आरंभ पर्व)**

यूपीएससी परीक्षा अत्यंत कठीण खडकवासला विधानसभा मतदारसंघातील वडगाव बु. येथील अगदी सामान्य कुटुंबातील शिवांश जागडे याने आपल्या कठोर मेहनतीने कोणताही बाह्य कोचिंग क्लास न घेता, पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळवले. देशभरातील लाखो विद्यार्थी ही परीक्षा देत असतात. परंतु शिवांशने आपल्या मेहनतीने या परीक्षेत देशात २६ वा आणि महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवत अगदी हेवा वाटावा, असे त्याने यश मिळवले आहे. या यशाचे कौतुक करण्यासाठी खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी शिवांशची भेट घेऊन मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच त्याला पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिवंशच्या जिद्दी जीवनशैलीने दाखवून दिले की, योग्य नियोजन, ठाम इच्छाशक्ती आणि सातत्यपूर्ण अभ्यासाने कोणतेही मोठे उद्दिष्ट साध्य करता येते. या यशाने गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर युवकांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास आ.तापकीर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. यावेळी माजी नगरसेवक श्री. हरिदास चरवड, श्री. अनंतदादा दांगट, श्री. दत्ताभाऊ पासलकर उपस्थित होते.

> **शिवांश जागडे याने UPSC परीक्षेत देशात २६ वा क्रमांक आणि महाराष्ट्रात दुसरा क्रमांक मिळवला. पहिल्याच प्रयत्नात, कोणताही बाह्य कोचिंग क्लास न घेता हे यश संपादन केले. वडगाव बुद्रुक येथील एक सामान्य कुटुंबातील विद्यार्थी असूनही कठोर मेहनतीने मोठे यश मिळवले.**






## एअरटेलकडून स्पॅम विरुद्ध लढाई सुरू ठेवताना नव्या वैशिष्ट्यांची घोषणा

- **आंतरराष्ट्रीय कॉल्स आणि एस.एम.एस साठी कव्हरेज वाढवले**
- **मराठी आणि आणखी 9 स्थानिक भाषांमध्ये स्पॅमची चेतावणी दर्शविणार (स्पॅम अलर्ट डिस्प्ले सादर करत आहे)**




**मुंबई/पुणे (दै. आरंभ पर्व)**

एअरटेलने असे एआय द्वारा समर्थित स्पॅम शोधणारे साधन (डिटेक्शन टूल) लाँच केले आहे ज्याने आपल्या ग्राहकांना स्पॅम म्हणून 27.5 बिलियन कॉल्स चिन्हांकित करून दाखविले आहेत आणि या लाँच नंतर आज स्पॅमर्सच्या दोन पाऊले पुढे राहण्याच्या उद्देशाने दोन महत्त्वपूर्ण सुधारणा सादर करण्याची घोषणा केली आहे. ग्राहकांना आता त्यांच्या पसंतीच्या भारतीय भाषांमध्ये कॉल्स आणि एस.एम.एस संदेशांसाठी स्पॅम अलर्ट्स मिळणार आहेत. हे नवे वैशिष्ट्य दहा स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध होणार आहेत आणि यामध्ये पुढे जाऊन आणखी भर घालण्याची योजना आखलेली आहे. एअरटेलचे एआय द्वारा समर्थित साधन आता ग्राहकांना आंतरराष्ट्रीय नेटवर्क वरून येणारे सर्व स्पॅम कॉल्स आणि एस.एम.एस शोधून काढून त्याची चेतवणी (अलर्ट) देणार आहे. एअरटेल ने देशांतर्गत स्पॅम कॉल्सचा सामना करण्यासाठी आपले प्रयत्न तीव्र केले आणि त्यानंतर, घोटाळेबाज आणि स्पॅमर्स यांनी परदेशी नेटवर्कचा गैरवापर करून भारतात फसवे कॉल पाठविण्यास सुरुवात केली. या भीतीदायक प्रवृत्तीमुळे गेल्या सहा महिन्यांमध्ये परदेशी स्पॅम कॉल्सचे प्रमाण 12% ने वाढलेले आहे. नवे वैशिष्ट्ये सादर करून एअरटेल हे वाढते आव्हान निष्प्रभावी करण्याची अपेक्षा करत आहे. या उपक्रमावर भाष्य करताना सिद्धार्थ शर्मा, डायरेक्टर मार्केटिंग आणि सी.ई.ओ कनेक्टेड होम्स, भारती एअरटेल म्हणाले, "आम्ही करत असलेल्या गोष्टींच्या केंद्रस्थानी आम्ही ग्राहक आणि त्यांचा अभिप्राय ठेवतो. ग्राहकांच्या अभिप्रायाचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यानंतर, आम्ही आमच्या उपायांमध्ये सुधारणा केली आहे जेणेकरून भारतातील भाषिक विविधतेची अधिक चांगल्या प्रकारे सेवा करता येईल. याव्यतिरिक्त, स्पॅम रहदारीचे वाढते प्रमाण परदेशी नेटवर्कवर स्थलांतरित झाल्याने, आम्ही आमच्या एआय द्वारा समर्थित साधनाचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे जेणेकरून आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून येणारे सर्व एस.एम.एस संदेश आणि फोन कॉल्स तपासता येतील. अभियंते आणि डेटा शास्त्रज्ञांची आमची समर्पित टीम आम्ही देऊ केलेल्या गोष्टी सुधारण्याचे आणि वाढविण्याचे काम करत राहील. यामुळे आम्ही कोणत्याही आणि आमच्या पुढे येत राहणाऱ्या सर्व धोक्यांना मागे सारत आहोत याची खात्री केली जाईल." अद्ययावत एआय-संचालित स्पॅम उपाय आता वापरकर्त्यांना दहा भारतीय भाषांमध्ये देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरील कॉल्स आणि संदेशांबद्दल सूचित करणार आहे. या भाषांमध्ये हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, तमिळ, कन्नड, मल्याळम, तेलुगू, पंजाबी आणि उर्दू सामील आहेत. अँड्रॉइड डिव्हाइस वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच फक्त स्थानिक भाषांचा वापर करून स्पॅम अलर्ट सूचना उपलब्ध केल्या जाणार आहेत. या सर्व वैशिष्ट्यांसाठी ग्राहकांना कोणतीही रक्कम भरावी लागणार नाही आणि सर्व एअरटेल ग्राहकांसाठी ती आपोआप सक्रिय केली जाणार असून त्यासाठी त्यांना सेवा विनंती द्यावी लागणार नाही. एअरटेलचे नाविन्यपूर्ण, उद्योगातील पहिले स्पॅमविरोधी साधन सप्टेंबर 2024 मध्ये लाँच केले गेले होते आणि त्याने आपल्या ग्राहकांसाठी चित्र पालटवून टाकलेले आहे. यामुळे नको असलेल्या संदेशांपासून पुरेसा आराम लाभलेला आहे. एअरटेलने दिलेल्या माहितीनुसार, तिने आतापर्यंत 27.5 बिलियन कॉल्सची ओळख पटविलेली आहे. याचा अर्थ दर सेकंदाला मोठ्या प्रमाणावर 1560 स्पॅम कॉल्स केले जात आहेत. सप्टेंबर 2024 मध्ये लाँच झाल्यापासून एअरटेलच्या ग्राहकांना येणाऱ्या स्पॅम कॉल्सचे प्रमाण 16% ने कमी झालेले आहे.




# थोडक्यात



## आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणार : डॉ. नीलम गोऱ्हे

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : अल्पवयीन निर्भया कबड्डीपटू होती, तिला जिल्हाधिकारी व्हायचे होते. पण एका नराधमाने तिचं आयुष्य नेस्तनाबूत केले. हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करणार, असे आश्वासन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी धर्मरायाची मांजरेवाडी (ता. खेड) येथील ग्रामस्थांना दिले. एका नराधमाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून खून केला. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्या पीडित कुटूंबाची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. नराधम आरोपी नवनाथ मांजरे याच्या अटकेनंतर पोलीस तपासात आणखी काय-काय समोर आलंय, याची माहिती गोऱ्हे यांनी घेतली. या कुटुंबाला मनोधर्य योजनेतून आर्थिक मदत लवकर मिळावी यासाठीही प्रयत्न केले जातील. अशा विकृती मूळतः ठेचण्याची गरज आहे. यासाठी सरकार कठोर पावले उचलेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आरोपीचा खटला फास्ट ट्रॅकमध्ये चालवण्यासाठी मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचे गोऱ्हे यांनी सांगितले. दरम्यान, स्थानिक ग्रामस्थांनी गावच्या वतीने आरोपीला फाशी व्हावी. या मागणीचे निवेदन दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे, माजी सरपंच भगवान मांजरे, जयसिंग मांजरे, योगेश मांजरे, शिवसेनेच्या विजयाताई शिंदे, नितीन गोरे, प्रकाश वाडेकर, ॲड. मनिषा टाकळकर, जया बैरागी, गणेश सांडभोर, काका कुलकर्णी यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## शिरूर हवेलीचे पर्यटक विमानाने पुण्यात येणार : आ. माऊली कटके



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : काल काश्मीरमधील पहलगाम येथे हल्ला झाला. या हल्ल्यात शिरूर हवेलीतील ६९ नागरिक अडकले होते . ही माहिती शिरूर- हवेलीचे आमदार माऊली कटके यांना कळताच त्यांनी ताबडतोब केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, खासदार सुनील तटकरे यांच्याशी संपर्क केला व जे पर्यटक अडकले आहेत त्यांनासुखरूप परत आणण्याची विनंती केली व उद्या हे पर्यटक विमानाने पुण्यात आणण्यात येणार असल्याची माहिती सुरू हवेलीचे आमदार माऊली कटके यांनी दिली. यावेळी पर्यटक ज्योती झुंरगे यांच्याशी संपर्क झाला असता त्यांनी सांगितले की आम्ही सर्व ६९ पर्यटक सुखरूप असुन श्रीनगर मध्ये आहोत .उदया आम्ही विमानाने पुण्यात येणार आहोत .यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ व आमदार माऊली कटके यांचे आभार मानले.

## एम्प्रेस गार्डनमध्ये वसुंधरा दिनानिमित्त वृक्षारोपण रोपण



पुणे (आरंभ पर्व) : पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या एम्प्रेस गार्डन व्यवस्थापनातर्फे आज जागतिक वसुंधरा दिनाच्या औचित्यानिमित्तप एक दुर्मिळ व आकर्षक वृक्ष अर्थात 'उर्वशी वृक्ष' याचे रोपण करण्यात आले. सकाळी १० वाजता संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. सुमनताई किर्लोस्कर यांच्या हस्ते आणि संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव पवार, मानद सचिव सुरेश पिंगळे, यशवंत खैरे, वनस्पती तज्ञ प्रा.श्री. द. महाजन, श्रीकांत इगळहळीकर,शर्वरी बर्वे, प्रशांत चव्हाण यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी शिवण, पिवळा कांचन, सोनचाफा, तामन, शेंदरी आदी वृक्षाचे रोपण करण्यात आले. उर्वशी वृक्ष मूळचा म्यानमार (ब्रम्हदेश) येथील असून, जगातील हाताच्या बोटांवर मोजता येतील अशा अतिसुंदर वृक्षांमध्ये त्याचा वरच्या क्रमांकावर गौरवाने उल्लेख होतो. अम्हर्स्टिया नोबिलिस हा सदाहरित वृक्ष आहे आणि त्याच्या विलक्षण सौंदर्यामुळे 'उर्वशी वृक्ष' म्हणूनही तो प्रसिद्ध आहे. एम्प्रेस गार्डन व्यवस्थापनाने नेहमीप्रमाणे या उपक्रमाचाही उद्देश पर्यावरण पूरकतेस प्रोत्साहन देणे, दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन करणे व नागरिकांना निसर्गाच्या सान्निध्यात एक सकारात्मक अनुभव देणे हा आहे. बागेमधील सौंदर्य व नैसर्गिक रचना अबाधित ठेवत, अशा दुर्मिळ वनस्पतींचे संकलन व रोपण करण्याचे काम संस्थेने सातत्याने चालू ठेवले आहे. एम्प्रेस गार्डन हे केवळ वनस्पतीप्रेमींसाठीच नव्हे, तर पर्यटन व कुटुंब सहलीसाठीसुद्धा एक आकर्षणाचे केंद्रबिंदू बनले आहे. बागेतील निसर्गरम्य व शांत वातावरण, सुसज्ज बसण्याची व्यवस्था व वाहत्या पाण्याच्या स्रोतांनी या ठिकाणाचे महत्व अधिकच वाढवले आहे.

# डिजिटल पेमेंट व्यवहारांमध्ये टॉप ५ शहरांमध्ये पुण्याचा समावेश

### वर्ल्डलाईन इंडिया वर्ष २०२४ च्या दुसऱ्या सहामाहीत समोर आलेली आकडेवारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशात होणाऱ्या डिजिटल पेमेंट व्यवहारांमध्ये आकारमान (व्हॉल्यूम) आणि मूल्य (व्हॅल्यू) या दोन्ही बाबतीत पुणे शहराने सर्वोच्च पाच शहरांमध्ये स्थान मिळवले आहे. डिजिटल पेमेंटच्या एकूण व्यवहारांमध्ये पुणे शहराचा वाटा ११ टक्के असून तो २०२३ च्या दुसऱ्या सहामाहीत ८ टक्के होता. तसेच एकूण व्यवहार मूल्यामध्ये पुणे शहराचा वाटा १० टक्के असून त्यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत ६ टक्के ची लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

पेमेंट सेवांमध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर असलेल्या वर्ल्डलाईन या कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ च्या सहामाहीत (जुलै-डिसेंबर २०२४) त्यांच्याद्वारे प्रक्रिया केलेल्या डिजिटल व्यवहारांचा नवीनतम अहवाल प्रकाशित केला.

यामध्ये भारतातील वेगाने विकसित होणाऱ्या पेमेंट इकोसिस्टममधील प्रमुख ट्रेंड मांडण्यात आले आहेत. त्यामध्ये ही माहिती समोर आली आहे.

सर्वाधिक डिजिटल व्यवहार असलेल्या टॉप ५ शहरांमध्ये बेंगळुरू, नवी दिल्ली, मुंबई आणि हैदराबाद या शहरांचा समावेश आहे.

वर्ल्डलाईन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश नरसिंहन म्हणाले, "डिजिटल व्यवहारांच्या संदर्भात भारतातील पहिल्या पाच शहरांमध्ये पुण्याला स्थान मिळाल्यामुळे त्याचे डिजिटल योगदान उठून दिसत आहे. कॅशलेस अर्थव्यवस्थेला त्यांनी जलदपणे स्वीकारले आहे हे त्यातून प्रतिबिंबित होत आहे. शहरातील गतिमान डिजिटल व्यवस्थेवर या टप्प्यामुळे प्रकाश पडत असून तंत्रकुशल लोक, भरभराटीला येत असलेले फिनटेक (अर्थ-तंत्रज्ञान) वातावरण आणि मजबूत डिजिटल पायाभूत सुविधा यांमुळे त्यांना चालना मिळत आहे. वर्ल्डलाईनमध्ये आम्ही व्यवसाय आणि ग्राहकांना दोन्ही सक्षम करणाऱ्या सुरक्षित, नाविन्यपूर्ण आणि समावेशक पेमेंट सोल्यूशन्सद्वारे या परिवर्तनाला चालना देण्यासाठी कटिबद्ध आहोत."

**प्रमुख ग्राहक ट्रेंड**

दुकानातील खरेदी बळकट राहिली आणि त्यामध्ये सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खालील व्यापारी श्रेणींचा समावेश होता :

- किराणा दुकाने
- रेस्टॉरंट्स
- सेवा केंद्रे
- कपड्यांची दुकाने
- सरकारी सेवा
- औषध दुकाने आणि रुग्णालये

या श्रेणींचा एकूण इन-स्टोअर व्यवहारांमध्ये वाटा अंदाजे ६८ टक्के आणि एकूण मूल्यामध्ये ५३ टक्के होता.

| सर्वाधिक व्यवहार असलेली शहरे | एकूण आकारमान (टक्के) | एकूण मूल्य (टक्के) |
|---|---|---|
| बंगळुरू | २० टक्के | १८ टक्के |
| दिल्ली | १६ टक्के | १६ टक्के |
| मुंबई | १४ टक्के | १४ टक्के |
| पुणे | ११ टक्के | १० टक्के |
| हैदराबाद | ९ टक्के | ११ टक्के |

**ऑनलाईन व्यवहारांना खालील गोष्टींनी चालना मिळाली**

- ई-कॉमर्स
- गेमिंग
- उपयुक्तता बिलांची देयके
- सरकारी सेवा
- आर्थिक सेवा

या वर्गांचा एकूण ऑनलाईन व्यवहारांमध्ये ८१ टक्के आणि मूल्यामध्ये ७४ टक्के वाटा होता.

## दीवाना मस्ताना बहारदार कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय चित्रपटसृष्टील महान संगीतकार सचिन देव बर्मन आणि राहुल देव बर्मन यांनी रचलेल्या गाण्यांचे एक अद्भुत सादरीकरण तसेच लोकसंगीत, अर्धशास्त्रीय आणि आधुनिक संगीताचे सुंदर मिश्रण केलेल्या दीवाना मस्ताना या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन रविवारी, २७ एप्रिल सायंकाळी ७ वा. गणेश कला क्रीडा मंच, पुणे या ठिकाणी सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांनी आयोजन केले आहे.

या प्रसंगी मराठीतील दिग्गज गायक बेला शेंडे, हृषिकेश रानडे, राजेश दातार, मधुरा दातार, जितेंद्र भुरूक, प्रशांत साळवी आणि चित्रपट कलाकारांच्या विशेष उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. तरी जास्तीजास्त पुणेकरांनी सदरील कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन



सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले होते.

यामध्ये व्हायोलिन गट आणि मोठ्या ऑर्केस्ट्रासह जितू ठाकूर, संगीत संयोजन केदार परांजपे, वाद्यवृंद केदार परांजपे, जितू ठाकूर व गट, अमर ओक, विशाल गंद्रटवार, विक्रम भट, केदार मोरे, अभिजित भदे, आदित्य आपटे, अमृता ठाकूर देसाई, मिहीर भडकमकर, विशाल थेलकर, विजू मूर्ती, प्रसाद गोंदकर, किशोर आंबेकर, किशोर कर्मकर, विशेष नानशिलकर हे असणार असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पंचवटकर करणार आहोत.

*सूरज चव्हाणच्या झापुक झुपूक सिनेमातील, सुप्रसिद्ध गायक चंदन कांबळे यांनी गायलेलं*

## 'वाजीव दादा' हे धमाकेदार हळदीच गाणं झालं रिलीज!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अख्ख्या महाराष्ट्रात झापुक झुपूकचं वेड पसरलय. सर्वत्र सूरज चव्हाणच्या या आगामी सिनेमाची चर्चा आहे. अशातच आता 'झापुक झुपूक' या चित्रपटाचं एक भन्नाट गाणं 'वाजीव दादा' प्रदर्शित झालंय. पहिल्या दोन गाण्यांना मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादानंतर 'झापुक झुपूक' सिनेमातील हे खास हळदीचे गाणे सध्या कमाल करत आहे. मराठी हळदी गाण्याच्या शोधात असाल, तर हे गाणं तुमच्या लग्नाच्या प्लेलिस्टमध्ये अवश्य जोडा! मस्तीने पुरेपूर आणि उत्साह ने भरपूर असलेलं असं हे लग्नसराईत जल्लोष आणतं. हळदीच्या तेजस्वी पिवळ्या रंगाप्रमाणेच हे मजेदार गाणं आहे जे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल आणि नक्कीच तुमचं वातावरण आनंद आणि उर्जेने भरून टाकेल.

'वाजीव दादा' हे गाणं सूरज



चव्हाण सह त्याच्या बिग बॉस मधील जवळच्या कलाकारांवर आणि इतर सह कलाकारांवर जसे जान्हवी किल्लेकर, छोटा पुढारी, वैभव चव्हाण, इरिना, हेमंत फरांदे, जुई भागवत आणि पुरुषोत्तम पाटील ह्यांच्यावर चित्रित केलं गेलय. गाण्यात ह्या सर्वांचा कल्ला आणि एकमेकांसोबतची जुगलबंदी पहायला मिळत आहे.

वाजीव दादा' ह्या गाण्याला गायक चंदन कांबळे आणि ज्ञानेश्वरी कांबळे ह्यांनी आपला आवाज दिला आहे. तर संगीतकार चंदन कांबळे हे आहेत. चंदन कांबळे हे मराठी संगीतविश्वातील एक लोकप्रिय गायक आहेत. त्यांची खास ओळख भक्तिगीते, लोकगीते आणि जिव्हाळ्याच्या सुरांनी भरलेल्या गाण्यांसाठी आहे. त्यांच्या भक्तिगीतांनी श्रोत्यांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. त्यांचे गायन शैली भावपूर्ण असून ग्रामीण रंग, श्रद्धा आणि साज या तिन्हींचा सुंदर संगम त्यांच्या गाण्यांमध्ये दिसतो आणि आता ते "झापुक झुपूक" च्या माध्यमातून पहिल्यांदा चित्रपटातील गाण्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करायला सज्ज झाले आहेत. त्यांचं 'वाजीव दादा' हे मराठमोळं गाणं प्रत्येकालाच थिरकायला लावणारं आहे. तेव्हा आता तुमची हळदी भारतीय पद्धतीने 'वाजीव दादा' च्या अंदाजात साजरी करूया!

विशेष म्हणजे ह्या गाण्याला मेटा ऑफिस मधून लाँच करण्यात आलं आणि यादरम्यान निर्माते आणि दिग्दर्शक केदार शिंदे हे उपस्थित होते. तर सूरज, पुष्कराज आणि त्याचे बिग बॉसच्या घरातील मित्र जान्हवी किल्लेकर, आणि छोटा पुढारी हे देखील उपस्थित होते.

"झापुक झुपूक" हा सिनेमा मनोरंजनाने भरपूर आहे. चित्रपटात सूरज सोबत इतर मराठी कलाकार जसे जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती सौ. बेला केदार शिंदे ,केदार शिंदे दिग्दर्शित "झापुक झुपूक" हा सिनेमा येत्या २५ एप्रिल २०२५ प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे !!

## पुण्यात क्लायंट असोसिएट्सचे नवीन कार्यालय सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात मोठी मल्टी-फॅमिली ऑफिस आणि प्रायव्हेट वेल्थ मॅनेजमेंट संस्था असलेल्या क्लायंट असोसिएट्स ने पुण्यात आपले नवीन कार्यालय ज्वेल स्क्वेअर.ऑफिस नंबर २०३, दुसरा मजला, हॉटेल ताज ब्लू डायमंड जवळ. कोरेगाव पार्क. पुणे-४११००१ येथे सुरू केल्याची आनंददायक घोषणा केली आहे. क्लायंट असोसिएट्स च्या २३ वर्षांच्या प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा असून, भारतातील विस्ताराच्या दिशेने खास करून वेगाने वाढणाऱ्या टियर-२ शहरांमध्ये उपस्थिती वाढवण्याच्या त्यांच्या निर्धाराचे हे प्रतीक आहे. या विस्ताराबद्दल बोलताना क्लायंट असोसिएट्सचे सह-संस्थापक श्री. हिमांशु कोहली म्हणाले, क्लायंट असोसिएट्स भारतातील सर्वाधिक आदर्श आणि प्रशंसनीय संपत्ती व्यवस्थापनाचे व्यासपीठ बनण्याचा प्रयत्न करत असताना, आम्ही



उदयोन्मुख महानगरांमधील प्रचंड संधींचा शोध घेत आहोत. पुणे हे शहर आर्थिक आणि नवोपक्रमाच्या दृष्टिकोनातून झपाट्याने विकसित होत असून, या शहरात आमची उपस्थिती वाढत्या हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स आणि अल्ट्रा हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स वर्गाला सर्वसमावेशक आणि वैयक्तिक संपत्ती उपाय (वेल्थ सोल्यूशन) देण्याच्या उद्देशाने आहे." पुणे कार्यालयाचे नेतृत्व श्री. अलकेश कुबावत, संचालक – वेल्थ, हे करणार आहेत. वेल्थ मॅनेजमेंट क्षेत्रातील २० वर्षांहून अधिक अनुभव असलेले ते एक अनुभवी व्यावसायिक आहेत. गेल्या ७ वर्षांहून अधिक काळ क्लायंट असोसिएट्स या संस्थेचा अविभाज्य भाग असलेल्या अलकेश यांच्यावर अनेक प्रतिष्ठित हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स आणि अल्ट्रा हाय नेट वर्थ इंडिव्हिज्युअल्स कुटुंबांनी त्यांच्या रणनीतिक दृष्टिकोन आणि ग्राहक-प्रथम दृष्टिकोनासाठी प्रचंड विश्वास ठेवला आहे. पुण्यातील त्यांच्या नेतृत्वामुळे क्लायंट असोसिएट्सची नावलौकिक असलेली उत्कृष्टता आणि बांधिलकी येथील ग्राहकांनादेखील अनुभवायला मिळणार आहे. क्लायंट असोसिएट्स सध्या सुमारे $ ७ अब्ज मूल्यमानाच्या संपत्तीवर सल्ला देते, आणि १३०० हून अधिक असैट अंडर एडवाइस, कुटुंबे आणि मोठ्या फॅमिली ऑफिसेस यांना सेवा प्रदान करते. संस्थेच्या व्यापक सेवा श्रेणीत प्रायव्हेट वेल्थ मॅनेजमेंट, इस्टेट प्लॅनिंग, टॅक्स ॲडव्हायझरी, फायनान्शियल प्लॅनिंग, रिअल इस्टेट ॲडव्हायझरी, विमा सेवा, कर्जसंबंधी उपाययोजना आणि इमिग्रेशन सेवा या गोष्टींचा समावेश आहे. पुढील वाटचालीकडे पाहताना, क्लायंट असोसिएट्स आगामी दोन वर्षांत ४ ते ५ टियर-२ शहरांमध्ये आणखी विस्तार करण्याचा निर्धार करण्यासोबतच २०३० पर्यंत आपल्या टीममध्ये १५० नवोदित व्यावसायिकांची भर घालण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे. या वाढीच्या प्रवासाचा एक भाग म्हणून, कंपनी नवीन शहरांमध्येही आपल्या वैयक्तिक, दर्जेदार ग्राहक अनुभवाची पुनरावृत्ती करण्याचा संकल्प करते आहे, जेणेकरून प्रत्येक ग्राहकाला अतुलनीय आणि पूर्णतः सानुकूलित आर्थिक उपाययोजना देण्याची त्यांची बांधिलकी अधिक दृढ होईल.

## 'पिंक ई-रिक्षा' उपक्रम, १०,००० महिलांना होणार फायदा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिला सक्षमीकरण आणि शाश्वत गतिशीलतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महाराष्ट्र सरकारने पिंक ई-रिक्षा' योजना सुरू केली आहे. महिला व बालविकास विभागाच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाची पुणे, नाशिक, नागपूर, अहमदनगर, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर या ८ जिल्ह्यांमध्ये १०,००० पर्यावरणपूरक कायनेटिक ग्रीन इलेक्ट्रिक तीन-चाकी रिक्षा तैनात करण्याची योजना आहे, ज्यामुळे महिला सक्षम होतील आणि पर्यावरणाला चालना मिळेल.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, महिला व बालविकास मंत्री श्रीमती अदिती तटकरे, कायनेटिक ग्रीनचे सह-संस्थापक व कार्यकारी संचालक रितेश मंत्री,विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी २१ एप्रिल रोजी पुणे येथे झालेल्या एका कार्यक्रमात महिला लाभार्थ्यांना पिंक ई-रिक्षा सुपूर्द केल्या.




- भारतातील सर्वात परवडणारी इलेक्ट्रिक कार एमजी कॉमेट केवळ 4.99 लाख रूपयांपासून सुरू होते, आणि बॅटरी भाडे फक्त 2.5 रूपये प्रति किलोमीटर आहे

## भारतातील स्ट्रीट-स्मार्ट कार : एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्मचे पुणेमध्ये अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने भारतातील स्ट्रीट-स्मार्ट कार एमजी कॉमेट चा नवा ब्लॅकस्टॉर्म एडिशन पुणे सादर केला. आकर्षक डिझाइन आणि स्मार्ट वैशिष्ट्यांनी सुसज्ज असलेली ही कॉमेट ब्लॅकस्टॉर्म ही कारची टॉप व्हेरिएंट आहे. ती बॅटरी-ऍज-अ-सर्व्हिस (बीएएएस) मॉडेलनुसार 7.80 लाख रूपये + 2.5 रूपये प्रति किमी या किमतीत मिळते. जे ग्राहक स्टायलिश आणि टेक्नॉलॉजीने परिपूर्ण शहरात चालवण्यायोग्य कारच्या शोधात आहेत, त्यांनी आता पुणेमधील एमजी शोरूमला भेट देऊन फक्त 11,000/- रूपये भरून नवीन एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म ची बुकिंग करता येईल.

एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म आपल्या 'स्टारी ब्लॅक' रंगातील बाह्य रचनेमुळे उत्कृष्ट शैली आणि दर्जाचा अनुभव देते, ज्यामुळे गाडीचा आकर्षकपणा आणखी वाढतो. कॉमेट ईव्ही हे नाव डार्क क्रोममध्ये कोरलेले असून, 'इंटरनेट इंसाईड' हे चिन्ह ब्लॅक कलर मध्ये सादर करण्यात आले आहे, जे सहजच सर्वांचे लक्ष वेधून घेतं. गाडीच्या आतील सजावटीतही ब्लॅक थीम कायम ठेवण्यात आली असून, लेदरेट सीट्सवर 'ब्लॅकस्टॉर्म' हे नाव रेड कलर मध्ये भरतकाम करून दिले आहे, जे एक दर्जेदार आणि प्रीमियम अनुभव प्रदान करते.

संगीतप्रेमींसाठी, कंपनीने कॉमेट ब्लॅकस्टॉर्म मध्ये आता 4 स्पीकर्स दिले आहेत, जे ट्रॅफिकमधील गोंगाटातही मन प्रसन्न करणारा संगीत अनुभव देतात. या नव्या व्हेरिएंटमध्ये 17.4 kWh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे, जी फास्ट चार्जिंगला समर्थन देते आणि 230 किलोमीटर* ची प्रमाणित रेंज देते. ग्राहक आपल्या कॉमेट ब्लॅकस्टॉर्म ला आणखी खास आणि वैयक्तिकृत करण्यासाठी एक विशेष ॲक्सेसरी पॅक घेऊ शकतात, ज्यामध्ये युनिक बॅज, व्हील कव्हर, तसेच पर्यायी स्टाईलिंग घटक जसे की हुड ब्रँडिंग आणि स्किड प्लेट्स यांचा समावेश आहे.

यावर टिप्पणी करताना, बी यू भंडारी, डीलर प्रिंसिपल, एमजी पुणे यांनी सांगितले, "एमजी कॉमेट ईव्ही हे पुणे औद्योगिक शहरासाठी एक आश्वासक उत्पादन आहे. आधुनिक भारतीय खरेदीदारांची बदलती आवड अशी आहे की त्यांना अशी गाडी हवी आहे जी त्यांच्या स्टाइलिश व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असते आणि एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म त्यांना विशेष बनवण्यास मदत करेल. कॉमेटच्या या नवीन आवृत्तीसोबत, स्टायलिश ब्लॅक एक्सटेरियर्स आणि प्रगल्भ डिझाइनसह दररोजच्या प्रवासाचा अनुभव उत्तम होईल, आणि एमजीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट मालकी अनुभवाचे वचन त्याचप्रमाणे टिकून राहील."

एमजी कॉमेट ईव्ही शहरी प्रवाश्यांच्या आवश्यक कार्यक्षमतेला त्याच्या इच्छित शैलीसोबत एक सुरक्षित आणि स्मार्ट पॅकेजमध्ये प्रदान करते. कॉमेट ईव्ही च्या विक्रीत कमर्शियल इयर '24 मध्ये कमर्शियल इयर'23 च्या तुलनेत 29% वाढ झाली आहे, जे कार खरेदी करणाऱ्यांमध्ये त्याच्या मजबूत स्वीकारार्हतेचे संकेत आहे. त्याच्या नाविन्या डिझाइन आणि वापरण्याच्या सोयीमुळे ते देशभरातील ग्राहकांमध्ये लोकप्रिय झाले आहे, ज्यामुळे ते स्टायलिश आणि पर्यावरणपूरक गतिमानतेसाठी एक आवडती निवड बनली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.